क्र.मासंवि/रवका/न.क्र.१२/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट नं.जी-९,
प्रो.अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड,
बांद्रा (पुर्व), मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्रमांक : ०२२- २६४७५९९५
फॅक्स क्रमांक ०२२-२६५८०६४२

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
Email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ४१४ दिनांक ०५ / ०६ / २०१२

विषय : सा.आ.२० (क) दि.१७.०६.१९६३ चे सु.प.६९ दि.२२.०२.१९९८ व प्रशासकीय परिपत्रक १८९ दि.१७.११.२००८ नुसार केलेल्या तरतुदीच्या खर्चास मंजुरीबाबतचे अधिकार प्रदान करणेबाबत.

संदर्भ : १) सा.आ. क्र.२० दि. १७.०६.१९६३.
२) सु.प.६९ दि.२२.०२.१९९८ (सा.आ. क्र.२० दि. १७.०६.१९६३ संलग्न)
३) प्रशासकीय परिपत्रक १८९ दि.१७.११.२००८

.....

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मधील कर्मचाऱ्यांना सा.आ. क्र.२० दि. १७.०६.१९६३ (वेळोवेळी सुधारित केलेल्या) अंतर्गत सु.प.६९ दि.२२.०२.१९९८ व प्रशासकीय परिपत्रक १८९ दि.१७.११.२००८ नुसार केलेल्या तरतुदीच्या खर्चास मंजुरीबाबतचे अधिकार प्रदान करणेबाबत प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. या संदर्भात आता व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (प्रकल्प), संचालक (संचलन) व संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करून खालीलप्रमाणे वैद्यकीय खर्च प्रतिपुर्तीचे अधिकार प्रदान करण्यास मंजुरी दिली आहे.

| अनु क्र. | सु.प.६९ दि.२२.०२.१९९८/प्रशासकीय परिपत्रक क्र.१८९ दि.१७.११.२००८ नुसार केलेली तरतूद | वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मंजुरीचे अधिकार असणारे सक्षम अधिकारी |
|---|---|---|
| १ | सा.आ.क्र.२० (क) दि.१७.०६.१९६३ मधील विहित आजारांवर शासकीय/निमशासकीय/मान्यताप्राप्त रुग्णालयांमध्ये उपचाराची सोय नसल्यास तसेच इतर काही कारणांमुळे त्यांना खाजगी रुग्णालयामध्ये पाठविल्यास (तसे पत्र शासकीय/निमशासकीय/ मान्यताप्राप्त रुग्णालयाने दिल्यास) खाजगी रुग्णालयातील खर्चाची १०० % प्रतिपुर्ती देय आहे. | वैद्यकीय सल्लागार, मुख्य महाव्यवस्थापक (सां.ले.) यांच्याशी विचार विनिमय करुन कार्यकारी संचालक (मासं) |
| २ | मुत्रपिंड विकाराने आजारी असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना डायलेसिस खर्चाची प्रतिपूर्ती देय आहे मात्र त्यासाठी जसलोक रुग्णालय, मुंबई येथील खर्चाच्या मर्यादित रकमेएवढीच रक्कम देय आहे. | वैद्यकीय सल्लागार, मुख्य महाव्यवस्थापक (सां.ले.) यांच्याशी विचार विनिमय करुन कार्यकारी संचालक (मासं) |

३. सदर प्रशासकीय परिपत्रक निर्गमित केल्याच्या तारखेपासून अंमलात येईल.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

*(संदेश ए. हाके)*
*मुख्य महाव्यवस्थापक (मासं)*

*D:\O&M\Hospitals\Adm.Cir.-Revision of Powers for Reimbursement.doc*
*5/6/2012*